# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.०६.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार **दिनांक २० जुन २००७** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ‘‘प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ‘‘येथे दुपारी १.२० वाजता ‘‘वंदेमातरम्‘‘या गिताने सुरू झाली.सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सर्जेराव खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१४. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१५. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१८. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
२०. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२१. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
२२. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२३. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२४. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२५. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी

२६. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२७. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२८. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२९. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
३०. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
३१. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
३२. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३३. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३४. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३५. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३८. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.सौ.राऊत छाया विलास
४१. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४२. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४५. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४६. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४७. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४८. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
४९. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५०. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५१. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५३. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५४. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५५. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५६. स.स.श्री.खुडे विजय किसन
५७. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५८. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५९. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६०. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६१. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६२. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव

६३. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
६४. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६५. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६६. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६७. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६८. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
६९. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७०. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७१. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७२. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७३. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७४. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७५. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७७. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७८. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७९. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८०. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.काशिनाथ कोकाटे : या महापालिकेचे माजी जकात अधिक्षक स्व.श्री.नारायण आबाजी वाहूळ यांनी महानगरपालिकेची अनेक वर्ष सेवा केली त्यांचे नुकतचे दुख:द निधन झालेले आहे सभागृहातर्फे त्यांना दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी.व तसा शोक संदेश त्यांचे कुटूंबीयांना पाठविण्यात यावा.

श्री.संतोष खेंडके : सिध्दार्थ उद्यान एक बालकाचा व एन -८ भागात एक बालक अशा दोन लहान मुलांचा विजेच्या प्रवाहाने निधन झालेले आहे त्यांना ही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.अ.रशिद खॉन : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहावे.

(याच वेळी स्व.श्री.नारायण वाहूळ तसेच ज्या दोन बालकांचा विजेच्या धक्क्याने नुकतेच निधन झाले त्यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री.संतोष खेंडके : नवनिर्वाचित सदस्य श्री.रवि कावडे यांचा सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे : यास माझे अनुमोदन आहे. अभिनंदन व सत्कार करण्यांत यावा.

मा. महापौर : सभागृहाच्या वतीने श्री. रवि कावडे यांचा सत्कार करण्यात येत आहे.

(याचवेळी नुतन स.सदस्य श्री.रवि कावडे यांचा मा.महापौर,मा.उपमहापौर व प्रशासनातर्फे मा.आयुक्त यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.)

मा. महापौर : विषय पत्रिका प्रथम घेतली जाईल चर्चेसाठी नंतर वेळ दिला जाईल.

**विषय क्र. ८३४/१ :**

दिनांक २९.०३.२००७,३०.०३.२००७,१२.०४.२००७,२०.०४.२००७,१८.०५.२००७ (का.प.क्र.४१) आणि दि.१८.०५.२००७(का.प.क्र.४२) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**चर्चा :**

सौ.मेहरून्नीसा खान : अगोदर चर्चा घेण्यात यावी. विषय पत्रिका घेण्यात येवू नये.

मा.महापौर : विषयपत्रिकेवर १८ विषय आहे.

सौ.मेहरून्नीसा खान :अगोदर चर्चा घेण्यात यावी.नंतर विषयपत्रिका घ्यावी.विषयपत्रिका अगोदर घेवू नये

श्री.अ.साजेद अ.सत्तार : चर्चा अगोदर करावी विषय पत्रिका नंतर घेण्यात यावी.

मा. महापौर : विषय पत्रिका अगोदर घेणार. नंतर चर्चेला वेळ दिला जाईल. सभागृहामध्ये विषय घ्यायचा की अगोदर चर्चा करायची हा महापौरांचा अधिकार आहे. विषय पत्रिका अगोदर घेणार आहेत त्यावर बोलावे. चर्चेसाठी वेळ दिला जाईल.

(याच वेळी मा. महापौर डायस समोर विरोधी पक्ष नेता व काही स. सदस्य एकत्र येऊन अगोदर चर्चा करावी म्हणून मोठमोठयाने मागणी करतात. काहीही ऐकू येत नाही.)

श्री.भगवान घडमोडे : विषयपत्रिका घेण्यात यावी.

मा. महापौर : विरोधी पक्ष नेता यांचेसह सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे चर्चा अगोदर की विषयपत्रिका घ्यायची हा महापौराचा अधिकार आहे. विषयपत्रिका अगोदर घेण्यात येईल.चर्चेसाठी वेळ दिला जाईल.

श्री.सलीम खान : जेंव्हापासून महापालिका अस्तित्वात आली तेंव्हा पासून सभेत अगोदर चर्चा होते.विनंती अगोदर चर्चा करावी नंतर विषयपत्रिका घेण्यात यावी.

मा.महापौर : विषय क्र.१

श्री. संतोष खेंडके : विषय क्र १ मध्ये स.सदस्यांच्या सूचना आहे ते ऐकावे.

श्री.रविकांत गवळी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम क्र ४४ नूसार व सभा कामकाज नियमावली ९६,९७ नूसार सर्व स.सदस्यांनी काही प्रश्न विचारलेले होते.

श्री.सलीम खॉन : चर्चा अगोदर घ्यावी. त्यानंतर विषय होईल.

(याचवेळी काही स.सदस्य मा.महापौर डायससमोर चर्चा अगोदर घ्यावी म्हणून खाली बसतात.)

श्री.काशिनाथ कोकाटे : स.सदस्य गैरवर्तन करीत आहे.

मा. महापौर : चर्चेसाठी वेळ दिला जाईल.

श्री.सलीम खान : लोकशाही मार्गाने कामकाज चालवावे.यापूर्वी सभागृहात अगोदर चर्चाच झालेली आहे त्यानंतर विषयपत्रिका घेण्यात येत असे.

श्री.संतोष खेंडके : शहर विकासाच्या दृष्टीने महत्वाचे विषय आहेत सर्वप्रथम विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : ज्या सदस्यांना विषयावर चर्चा करायची असेल त्यांनी थांबावे ज्यांना बाकीची चर्चा करायची असेल त्यांनी विषय संपल्यानंतर सभागृहात यावे.

मा. महापौर : महापालिकेच्या कायद्यामध्ये विषयपत्रिकेला अगोदर प्राधान्य आहे. नंतर चर्चेला वेळ दिला जाईल.

(याचवेळी मा.महापौर डायससमोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री.संतोष खेंडके :स.सदस्यांना विषयपत्रिकेवर लक्ष दयायचे नसेल विषय पत्रिकेत शहराच्या विकासाचे महत्वाचे विषय आलेले आहे. व सदस्यांना असा गोधंळ घालवायचा असेल तर महत्वाचे जे विषय आपले पक्ष बैठकीत ठरलेले आहेत ते मंजूर करावे बाकीचे स्थगित ठेवावे.

(याचवेळी स.सदस्य श्री.सलीम खॉन हे महापौर डायसवर जाण्याचा प्रयत्न करतात. इतर आघाडीचे काही सदस्य मोठमोठयाने बोलतात चर्चा अगोदर घ्यावी म्हणून मागणी करतात मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

मा.महापौर : चर्चेला वेळ दिला जाईल.

श्री.भगवान घडमोडे : विरोधी पक्ष नेते यांना शहराच्या विकासाची कदर नाही,फक्त गोधंळ आवडतो. त्यांना शहराच्या विकासाची जान नाही. शहराच्या विकासाची गरज नाही.

मा. महापौर : विषय क्र १ मंजूर करण्यात येत आहे.

(याचवेळी विषय मंजूर सर्व विषय मंजूर करावे मोठमोठयाने स.सदस्य बोलतात. स.सदस्य श्री.सलीम खॉन मा.महापौरांच्या डायसवर जाण्याचा प्रयत्न करतात. विषय क्र.२ मंजूर, ३ मंजूर ऐनवेळचे मंजूर म्हणून म्हणून काही सदस्य घोषणा देतात.)

मा. महापौर : स.सदस्य श्री.सलीम खान यांनी डायसवर येवू नये. सूचना देवूनही ते ऐकत नाही म्हणून स.स.श्री.सलीम खॉन हे महापौर डायसवर येण्याचा प्रयत्न करीत असल्याने त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते. त्यांनी सभागृहाच्या बाहेर जावे. कोणत्याही स.सदस्यांनी महापौर डायस समोर किंवा वर येणे बरोबर नाही.

**ठराव :**

दिनांक २९.०३.२००७,३०.०३.२००७,१२.०४.२००७,२०.०४.२००७,१८.०५.२००७ (का.प.क्र.४१) आणि दि.१८.०५.२००७(का.प.क्र.४२) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ८३५/२ :**

**वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीकडील प्रस्ताव**

दिनांक २१.०४.२००७ च्या वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीने ठराव क्र.२ अन्वये, महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांना वैद्यकीय देयक परतावा शासनाचे सुधारित वैद्यकीय प्रतिपूर्तीचे नियम लागू करणे बाबत शासनाचे परिपत्रक क्र.एमएजी/२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य,मंत्रालय, मुंबई दि.१९.०३.२००५ मंजूर केले आहे.त्यानुसार महानगरपालिका वैद्यकीय देयक परतावा नियम दुरूस्ती करून शासन नियमानुसार जादा आजारांचा समावेश करणेस तसेच शासन निर्णय दि.१०.०२.२००६ प्रमाणे अग्रिम मर्यादा रू.१,५०,०००/-(रू.एकलक्ष पन्नासहजार) वाढवण्याच्या आणि रक्ताचा कर्करोग ऐवजी सर्व कर्करोग अशी दुरूस्तीसह मंजुरी देवून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस केली आहे.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, या महानगरपालिकेत अधिकारी व कर्मचारी वर्ग यांना वैद्यकीय देयक परतावा महानगरपालिकेच्या विनियमानुसार देण्यात येत आहे. शासनाचे सुधारित वैद्यकीय प्रतिपूर्तीचे नियम लागू करणे बाबत शासनाचे परिपत्रक क्र.एमएजी/२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य, मंत्रालय,मुंबई दि.१९.०३.२००५ मंजूर केले आहे. त्यानुसार महानगरपालिका वैद्यकीय देयक परतावा नियम दुरूस्ती करून शासन नियमानुसार अधिक आजारांचा समावेश करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| मनपा वैद्यकीय देय परतावा विनियमात असलेले जून्या शासन निर्णयाप्रमाणे विद्यमान आजार :- | १.तिव्र हृदय रोग,२.मेंदुचे विकार,३.फुफुसाचे विकार,४.बेशुध्द अवस्था,५.रक्त दाब, ६.धनुर्वात,७.घटसर्प,८.अपघात,९.पोटाचेतिव्रविकार,१०.विषमज्वर,११.डोळ्यातील रेटीनाचा त्रास,१२.प्रसुती व स्त्री रोगाच्या अवघड अवस्था,१३.आकस्मिक गर्भपात, १४.मुत्रपिंड व मुत्राशयाचे विकार,१५.गॅसगॅग्रीन,१६.कान,नाक व घसा फॉरेन बॉडीमूळे होणारे त्रास.१७.जन्मत:व्यंगज्यामध्ये शस्त्रक्रिया आवश्यक आहे.१८.आगीमूळे भाजणे, १९.एड्स,२०.मनोविकृती. |
| मनपा विनियमात समाविष्ट करावयाचे सुधारित शासन निर्णयाप्रमाणे प्रस्तावित नविन आजार :- | १.जोरदार रक्तस्त्राव, २.गॅस्ट्रो एन्ट्रायटीस, ३.निशातेनावस्था(Coma), ४.इपीलेप्सी, ५.ॲक्युट लेकोमा, ६.स्पायपनस स्कॉड (मज्ञातंतू) संबंधित आकस्मिक आजार, ७.उष्माघात, ८.रक्त संबंधातील आजार, ९.प्राणी चावल्यामूळे होणारी विषबाधा, १०.रसायनामूळे होणारी विषबाधा. |
| जून्या शासन निर्णयाप्रमाणे ८०% वैद्यकीय परतावा देण्यात येते. | सुधारीत नियमाप्रमाणे शासनाने ९०% वैद्यकीय परतावा देण्याचा निर्णय आहे. |
| एकूण ०३ आजारांसाठी वैद्यकीय अग्रिम मर्यादा रू.४५०००/- मंजूर होती, हृदयाचा शस्त्रक्रिया, मुत्रपिंड रोपण व कर्करोग रक्ताचा. | सुधारीत निर्णयानुसार ०२ आजारांसाठी अग्रिम देण्याचा निर्णय आहे. मर्यादा रू.१,००,०००/- पर्यंत १.हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे व २.ॲन्जिओप्लॉस्टी शस्त्रक्रिया. |

तरी मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांना वैद्यकीय पोटी खर्च/अग्रिम देण्यास वैद्यकीय देयक परतावा विनियमात वरील आजाराचे समावेश करण्यास प्रस्ताव वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीची शिफारशीनंतर मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

मा. महापौर : विषय क्र २,३,४व विषय क्र ७ वर फक्त १.५टक्के,विषय क्र ६,९ व ११ स्थगित ठेवून सर्वविषय मंजूर करण्यात येत आहे.आणि ऐनवेळचे विषय मंजूर करण्यात येते व स्व.गोविंदभाई श्रॉफ चे नांव देण्याचा विषय स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय देयक परतावा शासनाचे सुधारीत वैद्यकीय प्रतिपूतीचे नियम जे शासनाचे परिपत्रक क्र.एमएजी/२००५/ ९/प्र.क्र.१/आरोग्य,मंत्रालय,मुंबई दि.१९.०३.२००५ मंजूर केले आहे, त्यानुसार महानगरपालिका वैद्यकीय देयक परतावा नियम दुरूस्ती करणेस आणि शासन परिपत्रकानुसार त्यात जादा आजारांचा समावेश करणे तसेच शासन निर्णय दिनांक १०.०२.२००६ प्रमाणे अग्रिम मर्यादा रू.१.५० लक्ष करणेस आणि रक्ताचा कर्करोग ऐवजी सर्व कर्मरोगाचा समावेश करणे तसेच ९०% वैद्यकीय परतावा यासह प्रस्तावित केल्याप्रमाणे महानगरपालिका वैद्यकीय देयक परतावा नियमास दुरूस्तीसह मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रशासकीय प्रस्ताव**

**विषय क्र. ८३६/३ :**

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, शहरातून वाहणाऱ्या खाम नदी पात्रालगत व पात्रामध्ये विविध ठिकाणी नागरीकांनी घरे बांधली आणि अतिक्रमणे केली आहेत.

दिनांक १२.५.२००७ रोजी मा.महापौर,मा.सभापती (स्थायी समिती),मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, संबंधित प्रभागाचे स.न. व मनपाचे वरिष्ठ अभियंते यांचेसह मनपा आयुक्त यांनी खाम नदी पात्र मार्ग हर्सूल,जहांगीर कॉलनी, एकतानगर,जटवाडा पूल, फरहतनगर, जलाल कॉलनी, आरेफ कॉलनी, बुऱ्हाणी कॉलनी, बेगमपुरा तळेश्वर मंदिर इ. परिसराची पहाणी केली.

सदर नदी पात्र हिमायत बाग पर्यंत ४५ मीटर रूंद करण्याची मार्कींग विभागाने केली असता, उपरोक्त संयुक्त पहाणीत सर्व मान्यवरांनी ४५ मीटर ऐवजी सदर पात्र ३० मीटर रूंद करून खोल करण्याचे ठरविले आणि ३० मीटर रूंद पात्रामध्ये हिमायतबाग पर्यंत बाधीत होणारी घरे/ अतिक्रमणे काढण्याचे निर्देशित केले. हिमायतबाग पासून पुढे आरेफ कॉलनी पर्यंत किमान ६० मीटर व आवश्यकतेनुसार त्यापेक्षा जास्त रूंदीचे पात्र घ्यावे लागणार आहे. कारण हिमायत बाग पासून दोन नद्यांचा संगम होऊन पुढे मोठी खाम नदी तयार होत आहे. जहांगीर कॉलनीपासून घरांवर मार्कींग करून घरे/ अतिक्रमणे काढण्याची व ३० मीटर पात्र खोल करण्याची कार्यवाही दिनांक १६.५.२००७ पासून सुरू करण्यात आली असता दिनांक १७.५.२००७ रोजी जहांगीर कॉलनी व एकतानगर येथील नागरीकांनी घरे/अतिक्रमणे काढण्यास तीव्र विरोध केला आणि रस्त्यावर आले. त्यांचे म्हणणे असे की, प्रथम त्यांना महानगरपालिकेने पर्यायी जागा व घर बांधणी करून द्यावी व नंतरच त्यांची घरे/अतिक्रमणे काढावीत. नागरीकांचा विरोध विचारात घेता दिनांक १७.५.२००७ रोजी आयुक्त यांचे दालनात तेथील नागरीकांचे प्रतिनिधित्व करणारे संबंधीत स.न. आणि मनपाचे वरिष्ठ अधिकारी यांची संयुक्तीक बैठक झाली. नारेगांव येथे विस्थापितांसाठी असलेल्या उपलब्ध जागेतून पर्यायी जागा देण्याचे प्रथम आयुक्त यांनी सुचित केले., परंतु प्रतिनिधीत्व करणारे स.न. आणि नागरीक यांनी त्यास विरोध दर्शविला. जहांगीर कॉलनी व एकतानगर भागातील रहिवाश्यांनी हर्सूल परिसरातच पर्यायी जागा उपलब्ध करून देणेची मागणी केली असता, हर्सूल येथील सर्वे नं.२१६ आणि २१७ या मनपाच्या ताब्यातील जमीनीमध्ये ६०० चौ.फुटाचे सध्या १०० भूखंड सिमांकीत करून ते अतिक्रमीतांना/विस्थापीतांना प्रथम देऊन नंतर अतिक्रमणे/घरे पाडण्याचे ठरले. तसेच नदी पात्रातील मार्कींगनुसार प्रथम घरे काढून घेणाऱ्यास पर्यायी जागेसोबत प्रथम प्राधान्य देण्यात येईल असे देखील ठरले. सर्वे क्रमांक २१६ व २१७ या जमिनीमध्ये तुर्त १५० भूखंडाची मार्कींग मनपाच्या नगर रचना विभागाने मे.खोत ॲण्ड पाटील असोसिएट्स यांचे सहाय्याने दोन दिवसात करून देणेसाठी बैठकीत सूचना करण्यात आल्या आहेत.

नागरीकांनी पर्यायी जागेसह घरे बांधून देण्याची केलेली मागणी या बैठकीत फेटाळण्यात आली आहे. तसेच विस्थापितांची व भूखंड विक्री करणाऱ्या मूळ मालकांची मालकी रीतसर सिध्द होत असेल तर नदीपात्रात बाधीत जागे ऐवजी मोफत पर्यायी जागा देण्याचे प्रस्तावीत आहे आणि ज्याची मालकी रितसर सिध्द होणार नाही, अशा अतिक्रमीतांना सध्या जरी अगोदर पर्यायी जागा देण्याचे ठरले. तरी त्या पर्यायी भूखंडाची किंमत संबंधित अतिक्रमीत/विस्थापितास मनपाकडे किमान हप्ता-हप्त्याने भरावी लागणार आहे, असे बैठकीत ठरले.

तरी सर्वे क्र.२१६ आणि २१७ मध्ये ६०० चौ.फुटाचे तूर्त १५० भूखंडाचे रेखांकन तयार करणे, हर्सूल ते हिमायतबाग ३० मीटर रूंद आणि हिमायतबाग ते बुऱ्हाणी कॉलनी, बेगमपुरा तळेश्वरमंदीर पर्यंत किमान ६० मीटर आणि अतिवृष्टीच्या आवश्यकतेनुसार त्यापेक्षा जास्त लागणाऱ्या रूंद पात्रात बाधीत होणारे नागरीकांना/अतिक्रमीतांना वरीलप्रमाणे पर्यायी जागा देणेसाठी नगररचना विभागाने रेखांकन करणे आणि नदीपात्र डीमार्केट करणेस आणि संबंधितांना पर्यायी जागा (प्लॉट) दिल्यानंतर तसेच प्रशासकीय विभागामार्फत डीमार्केटेड नदी पात्रातील बाधीत घरे/अतिक्रमणे काढणेच्या कार्यवाहीस मान्यता व्हावी.

तसेच तूर्त अगोदर विस्थापितांना ६०० वर्ग फुटाचे प्लॉट्स लगेचच दिल्या जातील आणि यशावकाश प्लॉटची योग्य किंमत ठरवून ती संबंधितांकडून हप्त्या-हप्त्याने वसूल केली जाईल.

प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वे क्र.२१६ आणि २१७ मध्ये ६०० चौ.फुटाचे तूर्त १५० भूखंडाचे रेखांकन तयार करणे, हर्सूल ते हिमायतबाग ३० मीटर रूंद आणि हिमायतबाग ते बुऱ्हाणी कॉलनी, बेगमपुरा तळेश्वरमंदीर पर्यंत किमान ६० मीटर आणि अतिवृष्टीच्या आवश्यकतेनुसार त्यापेक्षा जास्त लागणाऱ्या रूंद पात्रात बाधीत होणारे नागरीकांना/अतिक्रमीतांना वरीलप्रमाणे पर्यायी जागा देणेसाठी नगररचना विभागाने रेखांकन करणे आणि नदीपात्र डीमार्केट करणेस आणि संबंधितांना पर्यायी जागा (प्लॉट) दिल्यानंतर तसेच प्रशासकीय विभागामार्फत डीमार्केटेड नदी पात्रातील बाधीत घरे/अतिक्रमणे काढणे तसेच अगोदर विस्थापितांना ६०० वर्ग फुटाचे प्लॉट्स देणेस आणि यशावकाश प्लॉटची योग्य किंमत ठरवून ती संबंधितांकडून हप्त्या-हप्त्याने वसूल करणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३७/४ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान विकसित करण्याचे बोल्ट प्रकल्पाचे जागेवरील उपहाराचे स्टॉल विस्थापित करण्यासाठी व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यासाठी संगित कारंजा जवळील जागेवर दोन एफ आरपीचे कासवाकृती प्रतिकृती (९.२० लांबी × ६.२० रूंदी × ३.६८ मी.उंची) उभारून त्यात तात्पूरते उपहार स्टॉल विस्थापित करणेसाठी, एफ आरपी कासवाकृती प्रतिकृती दोन नग (६ मीमी जाडीचे एफ आरपी शीट आवरण व लोखंडी अँगलचा सांगाडाची उभारणी) व त्यामध्ये छोटे कारंजे उभारणे कामासाठी अ.प.रू.२०,९०,९००/- खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर आहे.

सदर कामाचा खर्च बोल्ट प्रकल्पाचे विना परवाना प्रिमीयम राशीचे जमा होणारे रकमेतून भरावयाचा आहे.

तरी प्रस्तावित प्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे कासवाकृती फायबर प्रतीकृती उभारणेचे अंदाजपत्रक रक्कम रू.२०,९०,९००/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथे कासवाकृती फायबर प्रतीकृती उभारणेचे रक्कम रू.२०,९०,९००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च बोल्ट प्रकल्पाचे विना परवाना प्रिमीयम राशीचे जमा होणारे रकमेतून भरावयास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३८/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.अ,ब,व क मधील मुख्य रस्त्याचे डांबरी पॅचवर्क व दुरूस्ती करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसुचीनूसार रक्कम रू.३२,२२,६६८/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पातील रस्ते दुरूस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे.

तरी सदर कामाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रभाग क्र.अ,ब,व क मधील मुख्य रस्त्याचे डांबरी पॅचवर्क व दुरूस्ती करण्याच्या कामाचे रक्कम रू.३२,२२,६६८/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च सन २००७-

०८ च्या अर्थसंकल्पातील रस्ते दुरूस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षातून करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८३९/ ६ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा हाताळणी व व्यवस्थापनाची कार्यवाही मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानूसार आणि वने, पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या २५ सप्टेंबर २००० च्या नोटी फिकेशन प्रमाणे करणे आवश्यक आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २००० मधील मुद्दे.

१. कचरा इतस्तत: न टाकता तो एकत्रीत जमा करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा नागरीकांना पुरविणे.

२. कचरा वेगवेगळा जमा करून वेगवेगळ्या कचरा कुंड्यात टाकणे.

३. घरोघर जाऊन कचरा जमा करून त्याची वाहतूक डंपींग स्टेशन पर्यंत करणे.

४. कचऱ्याची वाहतूक बंद वाहनातूनच करणे.

५. कचऱ्याची हाताळणी करताना मानवी बळाचा वापर कमी करून यांत्रीकी पध्दतीने हाताळणी करणे.

तथापी औरंगाबाद महानगरपालिकेकडे घनकचरा व्यवस्थापन नियम २००० चे पालन करण्यासाठी आवश्यक असणारी साधन सामुग्री व मनुष्य बळ उपलब्ध नसल्यामुळे घनकचरा व्यवस्थापनाचे खाजगी करण करणे गरजेचे झाले आहे.

घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमा मध्ये झालेल्या अमुलाग्र बदलांचे पालन करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेने या कामी All India Institute of Local Self Government, Mumbai या संस्थेची प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (पी.एम.सी.) म्हणून नियुक्ती केली आहे.

All India Institute of Local Self Government, Mumbai यांनी औरंगाबाद शहराच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी केलेल्या सखोल अभ्यासाव्दारे तयार केलेल्या प्रकल्प अहवालात प्राप्त झाला असून त्यानुसार घनकचरा व्यवस्थापनाच्या Collection, transfer & Transportation चा प्रकल्प रू.९,१३,३८,०००/- खर्चाचा आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. Total cost for Biodegredable & Recyclable Waste | --- | Rs. 7,7901000/- |
| 2. Total Capital Cost of one time Supply items | --- | Rs. 81,60000/- |
| 3. Total Cost for Debries & Green Waste | --- | Rs. 52,77000/- |
| **Total Project Cost** | | **Rs. 9,13,38000/-** |

प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेले दर पुढील प्रमाणे आहे.

1) Biodegredable &Recyclable Waste    Rs. 728 Per Ton

2) Debries Green Waste    Rs. 309 Per Ton

सरासरी प्रती टन रू.६४३.८८/- असा दर प्रकल्प अहवाला मध्ये प्रस्तावीत करण्यात आला आहे.

करीता All India Institute of Local Self Government, Mumbai यांनी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी साठी दिलेला प्रकल्प अहवाल मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ८४०/७ :**

अतिरीक्त शहर अभियंता हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहराचा वाढता व्याप, विस्तार व लोकसंख्या वाढीचे प्रमाण इत्यादी बाबी लक्षात घेता, शहराचा विकास करण्याचे हेतूने शहरातील सिडको भागातील तसेच चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील महत्वाचे व मुख्य रस्त्यांचे नुतनीकरण, मजबुतीकरण व आधुनिकीकरण करणेसाठी दि.२०.२.२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.४ (ऐनवेळेचा प्रस्ताव) अन्वये रू.६० कोटी कर्ज उभारणेस मान्यता प्राप्त आहे. यापूर्वी औरंगाबाद शहर एकात्मिक रस्ते कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त निधी रू.२५ कोटी अंतर्गत नियमित पेमेंट धर्तीवर तसेच २५ कोटी डिफर्ड पेमेंट धर्तीवर कामे करणेस मान्यता आहे. असे एकुण ११० कोटींचे काम होत आहेत.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त होणाऱ्या ११० कोटी रक्कमेतून खालील प्रमाणे नमूद असलेले रस्ते बांधणेचे काम हाती घेणेसाठी एकत्रित औरंगाबाद शहर रस्ते कार्यक्रम तयार करण्यात आलेला असून सदर कार्यक्रमासाठी रू.११० कोटी खर्च अपेक्षित आहे.

**मराठवाडा पॅकेज अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त २५ कोटी मधून हाती घेतलेली कामे.**

**(दि.२५.४.२००६ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.२५१/५ अन्वये मान्यता प्राप्त)**

१. व्यंकटेश मंगल कार्यालय ते शिवाजीनगर रेल्वे क्रासिंग पर्यंत रस्त्याची सुधारणा करणे.
२. बीड बायपास ते शहाशोक्ता दर्गा व रेल्वे उड्डाणपूल ते दै.तरूण भारत पर्यंत रस्ता सुधारणा करणे.
३. सिल्लेखाना ते लक्ष्मणचावडी २४ मी. रूंद रस्ता विकास करणे.
४. सेव्हनहिल ते गजानन महाराज मंदीर चौक आणि सावजी हॉस्पीटल ते व्यंकटेश मंगल कार्यालय ३० मी.रूंद रस्ता विकास करणे.
५. बाराभाई ताजिया ते महात्मा फुले चौक रस्ता विकास करणे.
६. लक्ष्मणचावडी ते एम.जी.एम.पर्यंत रस्ता विकास करणे.
७. जळगांव रोड ते जटवाडा २४ मी.रूंद रस्त्याचा विकास करणे.
८. हर्सूल ते ऑडीटर सोसायटी १५ मी. विकास योजना रस्ता सुधारणा करणे.
९. शहाशोक्ता दर्गाजवळ आर.सी.सी.पूल बांधणे.

**डिफर्ड पेमेंट धर्तीवर हाती घेतलेली कामे.**

**(मा.सर्वसाधारण सभा दि.१३.१.२००६ विषय क्र.१ अन्वये मान्यता प्राप्त)**

१. एकता चौक ते सुत गिरणी पर्यंत २४ मी.रस्ता विकास करणे.
२. सेव्हन हिल ते टि.व्ही.सेंटर रस्ता विकास करणे.
३. कटकट गेट ते पोलीस मेस पर्यंतचा रस्ता विकास करणे.
४. वेदांत हॉटेल ते पीर बाजार पर्यंतचा रस्ता विकास करणे.
५. विर सावरकर चौक ते जवाहर पोलीस स्टेशन पर्यंत रस्ता बांधणे.
६. गजानन महाराज मंदिर ते पुंडलिकनगर पर्यंतचा रस्ता विकास करणे.

**रू.६० कोटी कर्ज रूपाने प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून प्रस्तावित कामे.**

**(मा.सर्वसाधारण सभा दि.२०.२.२००७ विषय क्र.४ अन्वये मान्यता प्राप्त)**

१. एकता चौक ते पीरबाजार २४ मी.रस्त्यावरील पूल बांधणे.
२. मुथीयान कॉर्नर ते चौसरनगर रस्त्यावरील पूल बांधणे.
३. बिबि का मकबरा ते हनुमान टेकडी ८० मी.रस्ता विकास करणे.

४. कालिका माता मंदिर ते मयुर टेरेसेस १५. मी.रूंद रस्ता विकसित करणे.
५. आकाशवाणी चौक ते त्रिमुर्ती चौक ते गजानन महाराज मंदिर १८ मी.रूंद रस्ता विकसीत करणे.
६. रेल्वेस्टेशन ते बाबा पेट्रोलपंप पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे.
७. मोंढा नाका ते जवाहर कॉलनी पर्यंत १२ मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे.
८. ओंकारेश्वर चौक (उल्कानगरी) ते ज्ञानेश्वर नगर (चाणक्यपुरी रस्ता) १८ मी.रस्त्याचे डांबरीकरण करणे.
९. रविंद्रनगर ते कटकट गेट ३० मी. रूंद रस्ता सुधारणा करणे.
१०. दमडी महल ते जालनारोड ३० मी.रूंद रस्ता करणे.
११. टि.व्ही. सेंटर ते जळगांव टी पॉईंट (१.७५ की.मी.) रस्ता तयार करणे.
१२. एम.जी.एम. ते बळीराम पाटील हायस्कुल व्हाया बजरंग चौक रस्ता तयार करणे.
१३. दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील बाजूने ९ मी. रूंद वळण रस्ता तयार करणे.
१४. ४० फुट रेल्वेस्टेशन उड्डाण पुलाखाली रस्ता तयार करणे.
१५. वोखार्ड ते ग्रीव्हज ते अनिल केमिकल ३० मी.रूंद रस्ता तयार करणे.
१६. बेडसे पंल्प ते जी-२८ एम.आय.डी.सी.चिकलठाणा रस्ता तयार करणे.
१७. जळगांव रोड ते नारेगांव रस्ता तयार करणे.
१८. डि.-४ वोखार्ड रिसर्च सेंटर ते महाराष्ट्र डिस्टलरी ते धूत हॉस्पीटल ३० मी.रूंद रस्ता तयार करणे.
१९. सिध्दार्थ गार्डन जवळील आर.सी.सी.ब्रिज
२०. G.G.T. Kaypee to F-28 (मुकूंदवाडी ते फ्लेक्सोप्लास्ट)

वर निर्देशित कामांचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रारूप निविदा तयार करणे ई.सर्व कामे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे मार्फत करून घेण्यात येतील. निविदा पूर्व व निविदा नंतरचे सर्व कामे हाताळणेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २.५% फीस देणे प्रस्तावित आहे. उपरोक्त कामांमध्ये औरंगाबाद शहर रस्ते एकात्मिक कार्यक्रमांतर्गत असलेले तसेच डिफर्ड पेमेंट धर्तीवर असलेल्या कामात काही फेरफार झालेले असल्याने सर्व कामांचा एकत्रित रू.११० कोटींचा कार्यक्रम सादर करण्यात येत असून सदर कार्यक्रमात वर निर्देशित सर्व कामे तसेच भूसंपादन व सुविधा स्थलांतरीत करणेस लागणाऱ्या खर्चाचा समावेश आहे. तरी प्रकरणी एकत्रित कार्यक्रम रू.११० कोटींसाठी मान्यता व्हावी.

वर निर्देशित रस्त्यांव्यतिरीक्त भविष्यात शहरातील इतर महत्वाचे व मुख्य रस्ते आयआर.सी.च्या माणका प्रमाणे तयार करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची सेवा घेणेस मान्यता मिळणेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरासाठी एकत्रित रस्ते कार्यक्रम तयार करण्यांत आला असून प्रस्तावित र.रू.११० कोटी अपेक्षित खर्चापैकी मराठवाडा पॅकेज अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त रू.२५ कोटी मधून हाती घेतलेली प्रस्तावित कामे,डिफर्ड पेमेंटच्या धर्तीवर हाती घेतलेली कामे व रू.६० कोटी कर्ज रूपाने प्राप्त रक्कमेतून प्रस्तावित कामे तसेच प्रस्तावित रस्त्या व्यतिरिक्त भविष्यात शहरातील इतर महत्वाचे व मुख्य रस्ते आयआरसीच्या माणकाप्रमाणे तयार करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची सेवा घेणे तसेच प्रस्तावित कामांचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रारूप निविदा तयार करणे, निविदापूर्व व निविदा नंतरची सर्व कामे हाताळणेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना

अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५% फिस देणे यासह र.रू.११० कोटीच्या प्रस्तावित रस्त्यांच्या एकत्रित कार्यक्रमास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४१/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद ते पैठण रस्त्यावर रेल्वेस्टेशन जवळ रेल्वे उड्डाणपूल बांधलेला असून सदर उड्डाणपूलाच्या एका बाजूस रेल्वेची लेव्हल क्रॉसींग आहे. रेल्वे उड्डाण पूलाच्या दुसऱ्या बाजूचा स्लीप रोड महानगरपालिकेकडून लवकरच विकसीत करण्यात येत आहे. तरी रेल्वे उड्डाणपूलाच्या बाजूस सद्य:स्थितीत असलेले लेव्हल क्रॉसींग बंद करून त्याऐवजी उड्डाण पूलाच्या दोन्ही बाजूस रेल्वे विभागाने Railway Under Bridge (R.U.B.) बांधावेत.

एम.आय.डी.सी. औरंगाबाद, महानगरपालिका औरंगाबाद व रेल्वे विभाग यांनी रेल्वेस्टेशन एम.आय.डी.सी. जवळ २४ मीटर रूंद रस्त्यावर रेल्वे उड्डाण पुल बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सदर उड्डाण पूलाचे बांधकाम होणार असल्याने कबीरनगर जवळील रेल्वे लेव्हल क्रॉसींग बंद करून त्याऐवजी सदर ठिकाणी रेल्वे विभागाने Railway Under Bridge (R.U.B.) बांधावा अशी शिफारस करून रेल्वे विभागाला कळविणे करीता सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एम.आय.डी.सी.औरंगाबाद, महानगरपालिका औरंगाबाद व रेल्वे विभाग यांनी रेल्वेस्टेशन एम.आय.डी.सी. जवळ २४ मीटर रूंद रस्त्यावर रेल्वे उड्डाण पुल बांधण्याचे प्रस्तावित केलेले असल्यामूळे,सदर उड्डाण पूलाचे बांधकाम होणार असल्याने कबीरनगर जवळील रेल्वे लेव्हल क्रॉसींग बंद करून त्याऐवजी सदर ठिकाणी रेल्वे विभागाने Railway Under Bridge (R.U.B.) बांधावा अशी शिफारस करून रेल्वे विभागाला कळविणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४२/९ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३१३,३७६,३८३,३८६ नुसार व प्रकरण १८ चे सुचीनुसार जाहिरात/व्यावसायीक परवाना फी आकारण्याचे महानगरपालिकेला अधिकार आहेत. उपरोक्त कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका हद्दीतील दुकाने, व्यापारी अस्थापना, अन्य संस्था इत्यादींनी प्रदर्शित केलेल्या जाहिराती, दुकानाचे फलक, आकाश चिन्हे इत्यादींचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार दुकानांसाठी द्यावयाची परवाना फी चे प्रस्तावित दर व दुकानांवरील प्रदर्शित करण्यात येत असलेल्या जाहिरातीच्या प्रस्तावित दराचे विवरण पत्र तसेच परवान्याबाबतचे सर्वसाधारण नियम सोबतप्रमाणे असून प्रस्तावित दरावर विचार विनिमय करून व सदर दर मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

**परवान्याबाबतचे सर्वसाधारण नियम**

१) परवान्याची मुदत एक वर्षापुरती मर्यादीत असुन ती प्रती वर्षी दि.३१ मार्च रोजी संपेल.

२) परवाना ज्या व्यक्तीच्या नावाने दिला असेल अगर धंद्याकरीता वापरावयाच्या ज्या विशिष्ट जागेकरीता दिलेले असेल तेवढ्या व्यक्तीपुरताच अगर तेवढ्या जागेपुरताच (हे गृहित धरले जाईल) तो मर्यादीत राहील.

३) ज्या व्यक्तीच्या नावावर अगर ज्या विशिष्ट जागेकरीता परवाना दिला असेल तो.मा.महापालिका आयुक्त यांच्या संमतीशिवाय बदलता येणार नाही.

४) ज्या धंद्याकरीता परवाना घेणे जरूर आहे असा कोणताही धंदा एखादा विशिष्ट जागेत चालविण्यास मा.महापालिका आयुक्त यांनी परवानगी दिल्याशिवाय चालविता येणार नाही.

५) परवानाधारकास वर निर्दीष्ट केलेल्या मान्य विवक्षित ठिकाणाखेरीज अन्यत्र वा इतर सार्वजनिक जागी रस्त्यावर अगर फुटपाथवर काहीही वस्तु ठेवून त्याचा व्यापार अगर तत्संबंधी व्यवहार (करू नये)करता येणार नाही.

६) परवाना शुल्क परवाना मिळाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव परत दिले जाणार नाही. मा. महानगरपालिका आयुक्त अगर त्यांच्या वतीने परवाना शुल्क भरले गेले म्हणजे संबंधीत इसमास परवाना मिळाला असे नाही. परवाना शुल्क हे दरवर्षी आगाऊ भरण्याचे आहे. परवाना न मिळाल्यास भरलेले शुल्क परत देण्यात येईल.

७) धंदा करण्यास ज्या जागेस परवाना मिळाला असेल ती जागा परवानाधारकाने अगर त्यामार्फत काम पाहणाऱ्या इसमाने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यास ज्यावेळी जरूर असेल तेव्हा नियमाप्रमाणे केव्हाही तपासण्यास मोकळी ठेवली जाईल.

८) परवाना दिलेल्या ठिकाणी सहज दिसू शकेल अशा जागी परवानाधारकाने परवाना लावला पाहिजे.

९) परवानाधारकास परवान्याच्या मुदतीत धंद्याकरीता जास्त जागा, गोदाम अगर खोल्या लागल्यास त्याकरीता त्यास जादा परवाना मिळण्याकरीता अर्ज करावा लागेल व तो त्यास देण्याचे मान्य झाल्यास त्याकरीता वेळोवेळी ठरविण्यात आलेले शुल्क त्यास भरावे लागेल.

१०) परवाना दिल्यानंतर परवाना दिलेली जागा अगर माल परवान्यामध्ये नमुद केल्यापेक्षा जास्त असेल तर अशा जादा जागेबद्दल अगर त्या मालाबद्दल त्या मुदतीकरीता जागा परवाना शुल्क घेऊन जादा परवाना दिला जाईल व हे दोन्ही परवाने पुढील वर्षी जरूर लागल्यास एकत्रित करण्यात येतील.

११) परवाना घेणे जरूर असलेल्या निरनिराळ्या वस्तु परवानाधारकांच्या व्यवसायानुरूप ठेवल्या जागी असतील आणि त्या जर विक्रीकरीता नसतील तर त्यावर परवाना शुल्क घेतले जाणार नाही.

१२) ज्या व्यापाऱ्यास आपल्या धंद्याच्या परवाना पुन्हा पुढील वर्षाकरीता चालु ठेवावयाचा असेल त्याने त्याकरीता चालु परवान्याची मुदत संपण्यापूर्वी दोन महिने अगोदर मा.महापालिका आयुक्त यांच्याकडे अर्ज केला पाहिजे. त्या प्रमाणे अर्ज न केल्यास त्याबद्दल त्यास खालील प्रमाणे विलंब शुल्क पडेल.

| परवाना फी रूपये | विलंब शुल्क रूपये |
|---|---|
| १ ते ५० | १०.०० |
| ५० च्या वर | २०.०० |

परवान्याचे शुल्क दरवर्षी जानेवारी महिन्यात भरावयाचे आहे.

१३) धंद्याच्या विक्रीमुळे अगर वारस हक्कामुळे जर परवानाधारकाच्या नावात बदल करावयाचा असेल तर त्या करीता १० रूपये शुल्क घेतले जाईल.

१४) ज्यावेळी परवाना एक वर्षापेक्षा कमी मुदतीचा देण्यात येईल त्यावेळी खालील दराने परवाना शुल्क आकारण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | तीन किंवा त्याहून कमी महिन्यासाठी | - | वर्षाच्या परवाना शुल्काच्या २५ टक्के |
| (२) | तीन पेक्षा अधिक व सहा महिने अखेर | - | वर्षाच्या परवाना शुल्काच्या ५० टक्के |
| (३) | सहापेक्षा अधिक व नऊ महिने अखेर | - | वर्षाच्या परवाना शुल्काच्या ७५ टक्के |
| (४) | नऊ महिन्यापेक्षा अधिक | - | संबंध वर्षासाठी असलेले म्हणजे १०० टक्के |

१५) परवान्याची मुदत वाढवून देण्याचे शुल्क सर्वसाधारणपणे संबंध वर्षाचे भरावे लागेल, परंतु एका वर्षाहून कमी मुदतीचा परवाना पाहिजे असेल व त्याप्रमाणे पहिल्या परवान्याची मुदत संपल्यानंतर एक महिन्याच्या आत अर्ज दिला असेल तर परवाना शुल्क कमी मुदतीच्या परवाना शुल्काच्या दराने आकारण्यात येईल.

१६) परवान्याकरिता ग्राह्य धरलेल्या धंद्यात जर एकापेक्षा अधिक ,परवाने घेणे जरूर आहे अशा धंद्याच्या क्रिया (सेरिज ऑफ ऑपरेशन) एकाच ठिकाणी चालु असतील तर त्या सर्वांमध्ये ज्यावर सर्वात जास्त परवाना शुल्काची आकारणी होईल त्या धंद्याच्या क्रियेचा (ऑपरेशन्स) परवाना देण्यात येईल आणि त्या परवान्यामध्ये इतर क्रियेसंबंधीच्या अटी नमुद केल्या जातील.

१७) परवान्याच्या मुदतीत काही काळ धंदा तहकुब केला आणि त्यामुळे परवाना काढून घेतला असेल तर परवाना काढून घेतलेल्या मुदतीकरीता परवाना शुल्क परत दिले जाणार नाही.

१८) परवानाधारकास परवान्याच्या धंद्याची जागा रिकामी करावयाची असेल, पोटभाड्याने द्यावयाची असेल अगर ताबा सोडावयाचा असेल तर त्याप्रमाणे आपला इरादा परवानाधारकाने मा. महापालिका आयुक्त यांच्याकडे अर्ज करून ताबडतोब कळविला पाहिजे.

१९) ज्याठिकाणी निरनिराळ्या तऱ्हेची गळितांची धान्ये साठविली जात असतील व त्यातच जर कपाशीच बी साठविले असेल तर तो सर्व साठा एकत्रित लक्षात घेऊन एकच परवाना देण्यात येईल व त्या करिता मान्य झालेले परवाना शुल्क वसूल केले जाईल.

२०) ज्यावेळी परवाना शुल्क एक वर्षापेक्षा कमी मुदतीकरिता वसुल करावयाचे असेल आणि ते हिशोबाने जर एक रूपयापेक्षा कमी होत असेल तर त्या बाबतीत कमीत कमी म्हणून एक रूपया फी वसूल केली पाहिजे.

२१) आरोग्य विषयक परवान्यांसाठी अर्ज व त्याबाबतचा पत्र व्यवहार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या नावे करावा. सर्वसाधारण परवान्यासाठीचा अर्ज व त्याबाबतचा पत्र व्यवहार मा.महापालिका आयुक्त यांच्या नावे करण्यात यावा.

टिप :- शेड्युल चॅप्टर १८ भाग १ ते भाग ४ सोबत जोडण्यांत आले आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ८४३/१० :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाचे दिनांक ३०.०३.२००७ च्या निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील ‘‘नागरी दलित वस्ती सुधार योजना‘‘ कामासाठी रूपये १.०० कोटी इतके अतिरीक्त अनुदान उपलब्ध झालेले आहे. सदर अनुदानातून नागरी दलित वस्ती सुधारणा नियमावली अधिनस्त विकास कामे हाती घ्यावयाची आहेत. सदरहु योजनेच्या अधिन हाती घ्यावयाच्या कामाची प्रभागनिहाय यादी व ढोबळ अंदाजपत्रकीय रक्कम खालील यादीतील कामासमोर प्रस्तावित करण्यात आली आहे. करीता यादीत दर्शविल्या प्रमाणे अनुदाना अधिन हाती घेण्यासाठी प्रस्तावित आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | ढोबळ अ.प.र. |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.०७,भावसिंगपुरा येथे अंतर्गत रस्त्याचे खडीकरण/डांबरीकरण करणे बाबत. | रू.०७.०० लक्ष |
| ०२ | प्र.क्र.१२, जयभिमनगर, घाटी अंतर्गत अरूंद गल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत. | रू.०९.०० लक्ष |
| ०३ | हर्षनगर स्लम अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत. | रू.०७.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ०४ | प्र.क्र२१ आनंद गाडेनगर, नारेगांव येथे रस्ता खडीकरण/डांबरीकरण करणे बाबत. | रू.०९.०० लक्ष |
| ०५ | प्र.क्र.२३,शाह कॉलनी,मसनतपुर अंतर्गत रस्ता मजबुतीकरण/डांबरीकरण करणे बाबत. | रू.०९.०० लक्ष |
| ०६ | प्र.क्र.३८, गांधीनगर स्लम अंतर्गत अरूंद गल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत. | रू.०९.०० लक्ष |
| ०७ | प्र.क्र.५८, कैलास नगर अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे बाबत. | रू.०८.०० लक्ष |
| ०८ | प्र.क्र.६७,पंचशीलनगर,बौध्दनगरअंतर्गत अरूंद गल्यात पेव्हरब्लॉक बसविणे बाबत | रू.०७.०० लक्ष |
| ०९ | प्र.क्र.७४, अंतर्गत रोहिदासनगर, प्रकाशनगर येथील अरूंद गल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे. | रू.०९.०० लक्ष |
| १० | प्र.क्र.८६,प्रियदर्शनी- इंदिरानगर, गारखेडा अंतर्गत अरूंद गल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत. | रू.०८.०० लक्ष |
| ११ | प्र.क्र.९८, कश्मिरानगर, कांचनवाडी अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे बाबत. | रू.०८.०० लक्ष |
| १२ | प्र.क्र.२१, मिसारवाडी, नारेगांव वसाहती अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणे बाबत. | रू.१०.०० लक्ष |

करीता वरील यादीत प्रस्तावित नुसार कामे ''नागरी दलित वस्ती सुधार योजना'' अंतर्गत प्राप्त झालेल्या अतिरीक्त अनुदान सन २००६-२००७ अधिनस्त हाती घेण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाचे दिनांक ३०.०३.२००७ च्या निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील ''नागरी दलित वस्ती सुधार योजना'' कामासाठी रूपये १.०० कोटी अतिरीक्त उपलब्ध झालेल्या अनुदानातून प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते १२ नुसार विविध प्रभागातील कामे आणि न्यायनगर वस्तीचा''नागरी दलित वस्ती सुधार योजना'' अंतर्गत कामे करणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४४/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौलाना अबूल कलाम आझाद संशोधन केंद्राचे उद्घाटन दि.७.१०.२००६ रोजी झालेले आहे. सर्वसाधारण सभा दि.२४.११.२००५ ठराव क्र.१०४/७ अन्वये गठीत केलेल्या समितीने संशोधन केंद्रासाठी नियमावली तयार करून उद्दीष्टे निश्चित केलेली आहेत. सदर उद्दीष्टात विविध व्यावसायीक, शिक्षण, प्रशिक्षणासाठी अपयुक्त विविध भाषातील, उपयुक्त वाचन साहित्य खरेदी करणे.ई.चा समावेश आहे. त्यात व्यावसायिक शिक्षण- प्रशिक्षण जसे, संगणक शिक्षण व प्रशिक्षण ई.अभ्यासक्रमांचा समावेश केल्यास सर्वसामान्यांना याचा लाभ होऊ शकेल.

तरी वरील बाबी उद्दीष्टात समाविष्ट करण्यास सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांस मान्यता देण्यांत आली.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र. ८४५/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-१ सिडको सेक्टर बी महानगरपालिकेच्या मैदानालगत व्यायाम शाळेसाठी जागा आरक्षित आहे. सदर भूखंड प्रशासनाने विक्रीस काढलेला आहे. हा भूखंड साधारणपणे २४० चौ.मी.आहे. हा भूखंड महानगरपालिकेने खरेदी करावा व तेथे व्यायामशाळा बांधण्यात

यावी. हा भूखंड खरेदी करण्यासाठी २,५०,०००/- खर्च होणार आहे. सदर भूखंड महानगरपालिकेने ताब्यात घ्यावा, करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.दिपाली पाटील		अनुमोदक : सौ.अंजली कोंडेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-१ सिडको सेक्टर बी महानगरपालिकेच्या मैदानालगत व्यायाम शाळेसाठी आरक्षित असलेला भूखंड प्रशासनाने विक्रीस काढलेला असल्यामूळे, हा २४० चौ.मी.भूखंड महानगरपालिकेने खरेदी करणेस व हा भूखंड खरेदी करणेस येणाऱ्या र.रू.२,५०,०००/- खर्चास तसेच तेथे व्यायामशाळा बांधणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४६/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,प्रभाग क्र.५८,कैलासनगर ह्या प्रभागात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध ठिकाणी कामे करण्यासाठी रू.५० लक्षची तरतुद करण्यात यावी, करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविणे करीता मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सरलाताई सखाराम पोळ		अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५८,कैलासनगर ह्या प्रभागात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध ठिकाणी कामे करण्यासाठी रू.५० लक्षची तरतुद करण्यास व प्रस्ताव मंजुरीस्तव मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४७/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.६८सन २००७ ते ०८ अर्थसंकल्पात पृष्टक्र.डब्ल्यु-११७ अ.क्र. ४ वरील सिंधी कॉलनी येथील साईड पंख्याचे खडीकरण करणे असलेल्या तरतुदी लेखाशिर्ष बदलुन त्याऐवजी सिंधीकॉलनी येथील साईड पंख्यामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे असे करण्यात यावे ही नम्र विनंती.

सुचक : सौ.हर्षमाला विजयकुमार पाटणी		अनुमोदक : श्री.सुरेंद्रजितसिंग सबरवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६८ करीता सन २००७ ते ०८ च्या अर्थसंकल्पात पृष्ट क्र.डब्ल्यु-११७ अ.क्र. ४ वरील सिंधी कॉलनी येथील साईड पंख्याचे खडीकरण करणे असलेल्या तरतुदीचे लेखाशिर्ष बदलुन त्याऐवजी सिंधी कॉलनी येथील साईड पंख्यामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे असे करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४८/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,प्रभाग क्र.७३एस.टी.कॉलनी,एन-२प्रबोधनकार ठाकरे नगर येथील ज्ञानेश विद्यामंदीर शाळेसमोरील सार्वजनिक खेळाचे मैदानास (जागेचे क्षेत्रफळ ६६६६ स्क्वे.मि. सिडको मनपाचे खुले मैदानास)याभागातील सर्वनागरीकांच्या मागणीनुसार छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक क्रिडा मैदान असे नांव देण्यांत यावे. करीता उपरोक्त ठराव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे

अनुमोदक : श्री.बाबासाहेब लक्ष्मणराव डांगे, सौ.पुष्पाताई बाळुनाना शिंदे, श्री.नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७३ एस.टी.कॉलनी,एन-२ प्रबोधनकार ठाकरे नगर येथील ज्ञानेश विद्यामंदीर शाळेसमोरील सार्वजनिक खेळाचे मैदानास छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक क्रिडा मैदान असे नांव देण्यांस मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ८४९/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, थोर स्वातंत्र्यसेनानी पद्‌मविभुषण कै.गोविंदभाई श्रॉफ यांचे मराठवाड्याच्या विकासासाठी कार्य सर्वपरिचित आहे. औरंगाबादच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या विकासासाठी व तेथील जागांची संख्या वाढावी यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला, उच्च न्यायालया पर्यंत लढा दिला. या बाबींचा विचार करून आंबेजोगाई येथील ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयास ज्या प्रमाणे स्वामी रामानंद तीर्थ यांचे नाव देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे औरंगाबादच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयास ''स्वातंत्र्य सेनानी पद्‌मविभुषण कै.गोविंदभाई श्रॉफ'' असे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : ०१. श्री.वसंत नरवडे पाटील, ०२. श्री.भगवान (बापु घडमोडे), ०३. श्री.अ.साजेद अ.सत्तार

अनुमोदक : ०१. श्री.संतोष खेंडके पाटील, ०२. श्री.अब्दुल रशीद खान (मामु)

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ८५०/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, थोर स्वातंत्र्यसेनानी पद्‌मविभुषण कै.गोविंदभाई श्रॉफ यांचे मराठवाड्याच्या विकासासाठी कार्य सर्वपरिचित आहे. कै.गोविंदभाई श्रॉफ यांच्या कार्याची स्मृती जागृत रहावी या उद्देशाने औरंगाबाद शहरातील पैठणगेट या ठिकाणी त्यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : ०१. श्री.संतोष खेंडके पाटील, ०२. श्री.वसंत नरवडे पाटील, ०३. श्री.संजय रिडलॉन

अनुमोदक : ०१. सौ.लता दलाल, ०२. श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार, ०३. श्री.किशोर तुलशीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, थोर स्वातंत्र्यसेनानी पद्‌मविभुषण कै.गोविंदभाई श्रॉफ यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा पैठणगेट येथे उभारण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**पुरवणी विषय**

**विषय क्र. ८५१/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक २०.०२.२००७ च्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव क्र.७३३ अन्वये सी.टी.एस.क्र.१७४८४/२ मोहल्ला सब्जीमंडी सिल्लेखाना येथील ५०'×६०' जागा आरक्षण क्र.४० वाचनालयासाठी असलेले रद्द करून निवास भागात सामिल करण्यास मंजुरी झालेली आहे. परंतू या भागात वाचनालयाची आवश्यकता असल्याने ही जमिन वाचनालयातून न वगळता दि.२०.०२.२००७ रोजी ठराव क्र.७३३ अन्वये मंजूर केलेला ठराव रद्द करण्यासाठी नियमानुसार प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यांत येत आहे.

सुचक : सौ.कला बोरामणीकर,श्री.सतिष कटकटे

अनुमोदक : सौ.रजनीताई जोशी, सौ.रेखा काथार, श्री.संजु रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २०.०२.२००७ च्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव क्र.७३३ अन्वये सी.टी.एस.क्र.१७४८४/२ मोहल्ला सब्जीमंडी सिल्लेखाना येथील ५०'×६०' जागा आरक्षण क्र.४० वाचनालयासाठी असलेले रद्द करून निवास भागात सामिल करण्यास मंजुरी झालेली असल्यामूळे, परंतू या भागात वाचनालयाची आवश्यकता असल्याने ही जमिन वाचनालयातून न वगळता दि.२०.०२.२००७ रोजी ठराव क्र.७३३ अन्वये मंजूर केलेला ठराव रद्द करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,दि.१५.०६.२००७ रोजी महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान परिसरात समाधान भगवान नरवडे हा मुलगा विद्युतचा शॉक लागून यातच या मुलाचा दुरदैवी अंत झाला. त्यांच्या पाल्यांवर दुखाचे डोंगर कोसळले आहे. मृत्यूचे कारण मिमांकनुसार घाटी रूग्णालयातील तज्ञांनी विद्युत शॉकमुळे मृत्यू झाल्याचे प्रमाणीत केले आहे.

तरी सदर कुटूंबाचा आधार संपलेला असल्याने मयत मुलाच्या पाल्यांना महानगरपालिका परिसरात ही घटना घडल्याने नुकसान भरपाई म्हणून १ लाख रूपये अर्थसहाय्य देणे योग्य करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

सुचक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हाणोद्यीन

अनुमोदक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार,सौ.लता दलाल, श्री.त्रिंबक तुपे,
श्री.अब्दुल रशिद खान (मामू),श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान परिसरात समाधान भगवान नरवडे या मुलाचा विद्युत शॉक लागून दुर्दैवी अंत झाल्याने आणि सदर घटना महानगरपालिकेच्या परिसरात घडल्याने सदर मयत मुलाच्या पाल्यास रू.१.०० लाख अर्थसहाय्य देणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५३/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठवाड्याचे भूमीपुत्र व मराठवाड्याच्या विकासात ज्यांनी भरीव कार्य केले असे माजी केंद्रीयमंत्री स्व.श्री.प्रमोदजी महाजन यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा जालना रोडवरील हॉटेल अमरप्रीत समोरील महर्षि दयानंद चौक येथे महापालिकेच्या असलेल्या जागेवर उभारण्यांत यावा, अशी या शहरातील सर्व नागरीकांची मागणी आहे.

करिता जालना रोडवरील हॉटेल अमरप्रीत समोरील महर्षि दयानंद चौकात मराठवाड्याचे भूमीपुत्र स्व.श्री.प्रमोदजी महाजन यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारणेत यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संजय केनेकर

अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील,श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार,श्री.त्र्यंबक तुपे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोडवरील हॉटेल अमरप्रीत समोरील महर्षि दयानंद चौकात मराठवाड्याचे भूमीपुत्र व माजी केंद्रीय मंत्री स्व.श्री.प्रमोदजी महाजन यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५४/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत गाडगेबाबा यांनी जे प्रचंड सेवाकार्य केले, आपल्या हजारो किर्तनातून स्वच्छतेचा महान संदेश दिला. आजही संत गाडगेबाबा यांच्या नावे स्वच्छता अभियान सुरू आहे. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची प्रेरणा सतत मिळावी. नव्या पिढीला स्वच्छतेची व संत गाडगेबाबांच्या कार्याची माहिती व्हावी व त्यापासुन त्यांना स्फूर्ती मिळावी यासाठी स्वामी विवेकानंद उद्यानात त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे,श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार.

अनुमोदक : सौ.मिरा शिंदे, श्री.कैलास गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,स्वामी विवेकानंद उद्यानात संत गाडगेबाबा यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५५/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.८६ प्रियदर्शिनी इंदिरानगर या प्रभागात बहूतांश दलीत, मुस्लीम तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेले नागरीक राहतात. या नागरीकांच्या मुलांचे या परिसरात मनपाची शाळा नसल्यामूळे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी या परिसरात महानगरपालिकेतर्फे मराठी व उर्दू प्राथमिक शाळा सुरू करण्यात यावी करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.वंदना प्रकाश खंदारे, अनुमोदक : मोहम्मद जावेद मोहम्मद इसाक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८६ प्रियदर्शिनी इंदिरानगर या प्रभागात महानगरपालिकेतर्फे मराठी व उर्दू प्राथमिक शाळा सुरू करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५६/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहामध्ये विविध थोर पुरूषांची तैलचित्रे लावण्यात आलेली आहेत. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे माजी उप पंतप्रधान, लोकनेते कै.यशवंतराव चव्हाण यांचे तैलचित्रे या सभागृहात लावण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री.संजय शिरसाट

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहामध्ये संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे माजी उप पंतप्रधान, लोकनेते कै.यशवंतराव चव्हाण यांचे तैलचित्रे लावण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५७/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद हे शहर गत २० वर्षात झपाट्याने वाढलेले आहे. सध्या शहराची लोकसंख्या अंदाजे १२ ते १३ लाख इतकी आहे. या लोकसंख्येपैकी जवळपास ३० टक्के लोकसंख्या अनाधिकृत वसाहतीमध्ये राहते. या सर्व बाबींचा विचार करून शासनाने सन २००१ पर्यंत गुंठेवारी वसाहती अंतर्गत नागरी सुविधा देण्याचे मान्य केलेले आहे. परंतु अनधिकृत वसाहतींमध्ये राहणाऱ्याची संख्या ३० टक्के पेक्षा जास्त असल्यामुळे तसेच बहुतांश घरे २००१ च्या नंतर बांधण्यात

आलेली असल्याने सन २००६ पर्यंत अनाधिकृत घरे गुंठेवारी अंतर्गत कायम करणे योग्य ठरेल. त्यामुळे शहरातील जास्तीत जास्त लोकसंख्येला मुलभूत सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होईल व नागरीकांचा प्रश्न सुटेल.

करीता सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेने मंजुर करून शासनाकडे मान्यतेस्तव व विचारार्थ पाठविणे योग्य राहील करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.त्र्यंबक तुपे, सौ.लता दलाल,श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार.

अनुमोदक : श्री.नारायण कुचे, श्री.बाबासाहेब डांगे, श्री.विजय खुडे, श्री.सतिष कटकटे,सौ.कोंडेकर अंजली श्री.पुरूषोत्तम ठाकुर, श्री.रविकांत गवळी, सौ.रेखा काथार, श्री.रविंद्र गांगे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००६ पर्यंत शहरातील अनाधिकृत घरे गुंठेवारी अंतर्गत कायम करणेस व तसा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेस्तव व विचारार्थ पाठविणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५८/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५७ अंतर्गत येणाऱ्या रोहिदासपुरा भागातील नागरीकांची अनेक दिवसांची मागणी आहे की, जुना मोंढा येथील मुख्य चौकामध्ये संत रविदास महाराज यांचा पुतळा बसविण्यात यावा. संत रविदास महाराजांनी समाज सुधारणेचे मोठे काम त्या काळात केलेले आहे. तरी तेथील नागरीकांच्या मागणीचा विचार करता जुना मोंढा चौकामध्ये संत रविदास महाराज यांचा पुतळा बसविण्यात यावा. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे, अनुमोदक : सौ.लता दलाल, श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ अंतर्गत येणाऱ्या रोहिदासपुरा भागात जुना मोंढा येथील मुख्य चौकामध्ये संत रविदास महाराज यांचा पुतळा बसविण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५९/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे हर्सुल येथील सर्व्हे नंबर १९२ मधील १२.०० मीटर विकास योजना रस्ता (अस्तित्वातील १२.०० मीटर व ३६.०० मीटर विकास योजना रस्ता यांना जोडणारा) अंशत: तयार असून साधारणत: ७० ते ८० मीटर एवढ्या लांबीचा रस्ता महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्यामुळे सुमारे दोन ते तीन हजार लोकवस्तीला रस्ता उपलब्ध होवू शकत नाही. त्यामुळे तेथील नागरीकांना मोठ्या अडचणीस सामोरे जावे लागते. ह्या रस्त्याचा भाग महानगरपालिकेने संपादित केल्यास थोड्या खर्चास मोठ्या लोकवस्तीची प्रमुख अडचण दूर होवू शकते. ही बाब लक्षात घेता सदर रस्त्याची तातडीने भूसंपादन करण्यासाठी आवश्यक खर्चासह मान्यता देण्यात यावी.

सुचक : श्री.सिताराम सुरे अनुमोदक : श्री.पुनमचंद बमणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे हर्सुल येथील सर्व्हे नंबर १९२ मधील विद्यमान १२.०० मीटर रूंद व ३६.०० मीटर रूंद रस्त्यास जोडणारा मंजुर विकास योजनेतील १२ मीटर रूंद रस्ता भूसंपादन करणेस व भूसंपादनास येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळेचे विषय

**विषय क्र. ८६० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोतीवाला नगर ते कैलासनगर स्मशानभूमी ते दादा कॉलनी ते भवानीनगर,तक्षशिलानगर ते जाफरगेट पुलापर्यंतचा नाला सफाई (Desilting) करणे च्या कामाचे अंदाजपत्रक सन २००६-२००७ च्या एमजेपी च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.२९,२६,५००/- इतके होत आहे. सदर नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला आहे. सदर ठिकाणची पाहणी मा.महापौर,मा.उपमहापौर,मा.सभापती-स्थायी समिती, मा.सभागृह नेता, व मा. विरोधी पक्षनेता यांनी केलेली आहे. सदर नाल्यातील मलबा/गाळ काढून त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. या नाल्यातून जाणारी मुख्य सिव्हर लाईन जागोजागी फुटलेली आहे. नाल्यामधून वाहत असलेल्या ड्रेनेज मलब्यामुळे आणि केरकचऱ्यामुळे नाल्यात थरावर थर साचलेले आहेत. ज्यामुळे मेन सिव्हर लाईनचे दुरूस्तीचे काम करणे देखील शक्य होत नाही. सदरील अंदाजपत्रकानुसार भाग-१ चे काम झाल्यानंतर नाल्यातील जलनि:सारण वाहिन्यांचे चित्र स्पष्ट होईल व तद्नंतर भाग-२ म्हणजेच मुख्य जलनि:सारण वाहिनी व त्यालगत असलेल्या इतर ज.नि.वाहिन्यांचे दुरूस्तीचे काम करण्याचे अंदाजपत्रक करता येईल.

प्रस्तावित कामासाठी अर्थसंकल्प २००७-२००८ मध्ये पान क्र. डब्ल्यु-२२४ रक्कम रू.३०.०० लक्ष उपलब्ध करण्यात आली आहे.

तरी मोतीवाला नगर ते कैलासनगर स्मशानभूमी ते दादा कॉलनी ते भवानीनगर, तक्षशिलानगर ते जाफरगेट पुलापर्यंतचा नाला सफाई (Desilting) करणेच्या कामाचे रक्कम रू.२९,२६,५००/- चे अंदाजपत्रक विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोतीवाला नगर ते कैलासनगर स्मशानभूमी ते दादा कॉलनी ते भवानीनगर, तक्षशिलानगर ते जाफरगेट पुलापर्यंतचा नाला सफाई (Desilting) करणेच्या कामाचे रक्कम रू.२९,२६,५००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आयुक्त महानगरपालिका यांनी मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मांडला आहे की, शिक्षण विभागातर्फे सन २००७-२००८ या शैक्षणिक वर्षात १ लि ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक पुरविणे आहे.

सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत सर्व मुली व अ.जा. आणि अ.ज. मधिल मुले यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यात येतात, उर्वरीत विद्यार्थ्यांना (मुले) औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मोफत पाठ्यपुस्तके पुरविणे असल्याने त्यांची संख्या ३०३१ गृहित आहे. त्यास्तव अंदाजे रक्कम रू.२.४० लक्ष खर्च अपेक्षित आहे. हा खर्च शिक्षण विभागाचे लेखाशिर्ष शैक्षणिक साहित्य व विज्ञान साहित्य मधून भागविण्याच्या व उर्वरीत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्याचे सह प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागातर्फे सन २००७-२००८ या शैक्षणिक वर्षात १ लि ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक पुरविणेच्या रक्कम रू.२.४० लक्ष खर्चास मंजुरी देण्यांत येते, तसेच सदरील खर्च शिक्षण विभागाचे लेखाशिर्ष शैक्षणिक साहित्य व विज्ञान साहित्य मधून भागविण्यास व उर्वरीत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महापालिकेच्या विविध विभागातुन अमेंडर टेंडर व स.सदस्यांच्या स्वेच्छा निधितून रक्कम खर्च करून ''इ'' टेंडर पध्दतीने निविदा मागविण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. ती रद्द करून पुर्वीच्या ए-१ टेंडर पध्दतीने करण्यात यावा या करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.रशीद मामू

अनुमोदक : श्री.सतिष कटकटे, श्री.कैलास गायकवाड, श्री.संतोष जेजुरकर,श्री.बाबासाहेब डांगे
श्री.विजय खुडे, श्री.अनिल जैस्वाल, श्री.राजेश व्यास, श्री.रविकांत गवळी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेच्या विविध विभागातुन अमेंडर टेंडर व स.सदस्यांच्या स्वेच्छा निधितून रक्कम खर्च करून ''इ'' टेंडर पध्दतीने निविदा मागविण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. ती रद्द करून पुर्वीच्या ए-१ टेंडर पध्दतीने करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२२९ (व्यापारी संकुले व इमारत निधी) अ.क्र.३ प्रभाग क्रमांक १७ श्रीकृष्णनगर येथे हास्ययोग भवन बांधणे (रू.१० लाख)

व नाला ट्रेनींग कामे (पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२११ अ.क्र.६ वार्ड क्रमांक १७ एन-९ एच-२० पासून सुरू झालेल्या नाल्यास संरक्षित भिंत बांधणे (५ लाख)

**वरील दोन्ही कामा ऐवजी**

वार्ड क्रमांक १७ श्रीकृष्णनगर मध्ये मोकळ्या जागेत बॅडमिंटन हॉल बांधणेसाठी (रू.१५ लाख) ची तरतुद करण्यात यावी.

वरील प्रस्ताव मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

सुचक : श्री.महेश माळवतकर अनुमोदक : श्री.सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२२९ व्यापारी संकुले व इमारत निधी अ.क्र.३ प्रभाग क्रमांक १७ श्रीकृष्णनगर येथे हास्ययोग भवन बांधणे रू.१० लाख व नाला ट्रेनींग कामे पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२११ अ.क्र.६ वार्ड क्रमांक १७ एन-९ एच-२० पासून सुरू झालेल्या नाल्यास संरक्षित भिंत बांधणे ५ लाख या दोन्ही कामाऐवजी वार्ड क्रमांक १७ श्रीकृष्णनगर मध्ये मोकळ्या जागेत बॅडमिंटन हॉल बांधणेसाठी रू.१५ लाख रू.वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-०८ अर्थसंकल्प पुस्तिकात नमुद खालील प्रमाणे कामाचे लेखाशिर्षक बदलणे.

**''अ''**

१) वार्ड-२९ अंतर्गत मनपा शाळेच्या भोवती संरक्षित भिंत बांधणे. पा.क्र.-डब्ल्यु-२०२ रू.३ लाख

२) वार्ड -२९ म.न.पा क्वार्टरचा खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे.पा.क्र.डब्ल्यु-१९८ रक्कम ५ लाख

३) वार्ड-२९ अंतर्गत म.न.पा शाळेच्या खुल्या जागेवर पेव्हर ब्लॉक बसविणे. पा.क्र.डब्ल्यु-१८६ रू.५ लाख

४) वार्ड -२९ वि.आयुक्त कार्यालय ते मुकबधीर शाळेपर्यंत तलावालगत संरक्षित भिंत बांधणे पा.क्र.डब्ल्यु-२१२ वर रक्कम -९ लाख या उपरोक्त कामाऐवजी ''वार्ड क्र.२९ मध्ये दिल्लीगेट जलकुंभापासून ते हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनी पुलापर्यंत जलवाहिनी टाकणे. एकुण रक्कम :- २२ लाख

**''ब''**

१) वार्ड क्र.२९ विविध ठिकाणी गटारी बांधणे : पान क्र.डब्ल्यु-२१० वर रक्कम -५ लाख

२) वार्ड क्र.२९ विविध ठिकाणी गटारी दुरूस्ती करणे पान क्र.डब्ल्यु-२१० वर रक्कम -३ लाख

**<u>या कामाऐवजी</u>**

''वार्ड क्र-२९ मध्ये फरशी दुरूस्ती, खडी रस्ते, पेव्हर ब्लॉक बसविणे, गटारी दुरूस्ती, माती उचलणे, कॉंक्रेटींग करणे,मुरूम टाकणे, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, संरक्षित भिंत बांधणे- दुरूस्ती करणे, इतर आवश्यकतानुसार फुटकळ कामे करणे. वार्ड कार्यालय ''क'' कडे (जाफर गेट)वळती. एकुण रक्कम -८ लाख.

सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.मो.जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२९ साठी अर्थसंकल्प सन २००७-०८ मध्ये असलेल्या खालील कामांचे लेखाशिर्ष बदलणेस मंजुरी देण्यांत येते.

**''अ''**

१) वार्ड-२९ अंतर्गत मनपा शाळेच्या भोवती संरक्षित भिंत बांधणे. पा.क्र.-डब्ल्यु-२०२ रू.३ लाख

२) वार्ड -२९ म.न.पा क्वार्टरचा खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे.पा.क्र.डब्ल्यु-१९८ रक्कम ५ लाख

३) वार्ड-२९ अंतर्गत म.न.पा शाळेच्या खुल्या जागेवर पेव्हर ब्लॉक बसविणे. पा.क्र.डब्ल्यु-१८६ रू.५ लाख

४) वार्ड -२९ वि.आयुक्त कार्यालय ते मुकबधीर शाळेपर्यंत तलावालगत संरक्षित भिंत बांधणे पा.क्र.डब्ल्यु-२१२ वर रक्कम -९ लाख या उपरोक्त कामाऐवजी ''वार्ड क्र.२९ मध्ये दिल्लीगेट जलकुंभापासून ते हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनी पुलापर्यंत जलवाहिनी टाकणे. एकुण रक्कम :- २२ लाख

**''ब''**

१) वार्ड क्र.२९ विविध ठिकाणी गटारी बांधणे : पान क्र.डब्ल्यु-२१० वर रक्कम -५ लाख

२) वार्ड क्र.२९ विविध ठिकाणी गटारी दुरूस्ती करणे पान क्र.डब्ल्यु-२१० वर रक्कम -३ लाख

**<u>या कामाऐवजी</u>**

''वार्ड क्र-२९ मध्ये फरशी दुरूस्ती, खडी रस्ते, पेव्हर ब्लॉक बसविणे, गटारी दुरूस्ती, माती उचलणे, कॉंक्रेटींग करणे,मुरूम टाकणे, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, संरक्षित भिंत बांधणे- दुरूस्ती करणे, इतर आवश्यकतानुसार फुटकळ कामे करणे.वार्ड कार्यालय''क'' कडे (जाफर गेट)वळती. एकुण रक्कम -८ लाख.

**<u>विषय क्र. ८६५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक -१८, पवननगर या प्रभागात सेक्टर एल, शिवाजीनगर या परिसरात असलेल्या महानगरपालिकेच्या सभागृहास ''श्री हरि सभागृह'' असे नांव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रकाश अत्तरदे, अनुमोदक : श्री.सिताराम सुरे, श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक -१८, पवननगर सेक्टर एल, शिवाजीनगर या परिसरातील महानगरपालिकेच्या सभागृहास ''श्री हरि सभागृह'' असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८२ येथे मातोश्री नगर अंतर्गत प्राथमिक शाळा बांधणे साठी व मातोश्री नगर येथे खुल्या जागेस संरक्षक भिंत बांधणेसाठी सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पान क्र.२२८ वर प्रत्येकी १० लक्षची तरतुद करण्यात आली आहे.

तथापी सदरील २० लक्ष रू.गजानन नगर, न्यु हनुमान नगर गुंठेवारी भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी वळती करण्याकरीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेत विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पार्वतीबाई वाघमारे

अनुमोदक : श्री.रविंद्र गांगे, श्री.अनिल जुगललाल जैस्वाल,श्री.रविकांत गवळी,श्री.प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८२ साठी मातोश्री नगर अंतर्गत प्राथमिक शाळा बांधणे व मातोश्री नगर येथे खुल्या जागेस संरक्षक भिंत बांधणेकरीता अर्थसंकल्प सन २००७-२००८ पान क्र.२२८ वर प्रत्येकी असलेल्या र.रू.१०.०० लक्ष तरतुदी **ऐवजी** गजानन नगर, न्यु हनुमान नगर गुंठेवारी भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी र.रू.२०.०० लक्ष वळती करणेस मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७६ मध्ये विविध विकास कामे सन २००७-२००८ अंतर्गत करणे आवश्यक असल्याने प्राप्त तरतुदीमधुन खालील विकास कामांच्या लेखाशिर्ष मध्ये बदल करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | अर्थसंकल्प पा.क्रं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | डब्ल्यु-१७४ | नविन उद्याने<br>सिडको एन-२ रामनगर प्रभागातील विविध खुल्या जागेत खेळणी बसविणे.- ५.०० लक्ष | नविन पथदिवे<br>प्र.क्र. ७६ विठ्ठलचौकात हायमस्ट बसविणे-५.०० लक्ष |
| ०२ | डब्ल्यु-१७५ | वि.योजना भूखंड संरक्षण<br>रामनगर मधील एल-३ खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे-४.०० लक्ष | नविन पथदिवे<br>रामनगर मधील मुख्य रस्ता चौकात हायमस्ट बसविणे-४.०० लक्ष |
| ०३ | डब्ल्यु-२१६ | भांडवली कामे पाणी पुरवठा<br>वार्ड क्र.७६ विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे-५.०० लक्ष | नविन पथदिवे<br>वार्ड क्र.७६ एन-२ मध्ये हायमस्ट बसविणे-५.०० लक्ष |
| ०४ | डब्ल्यु-१७५ | विकास योजना भूखंडाचे संरक्षण | वार्ड-इ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प.क्र.७६ मधिल विविध खुल्या जागा विकसीत करणे-२०.०० लक्ष | वार्ड क्र.७६ मधिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा आरसीसी शेड बांधणे व परिसर विकसीत करणे-२.५० लक्ष |

करीता उपरोक्त प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान (बापु)घडमोडे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.पुनम बमणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७६ साठी सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलणेस मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प पा.क्रं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | डब्ल्यु-१७४ | नविन उद्याने<br>सिडको एन-२ रामनगर प्रभागातील विविध खुल्या जागेत खेळणी बसविणे.-५.०० लक्ष | नविन पथदिवे<br>प्र.क्र. ७६ विठ्ठलचौकात हायमस्ट बसविणे-५.०० लक्ष |
| ०२ | डब्ल्यु-१७५ | वि.योजना भूखंड संरक्षण<br>रामनगर मधील एल-३ खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे-४.०० लक्ष | नविन पथदिवे<br>रामनगर मधील मुख्य रस्ता चौकात हायमस्ट बसविणे-४.०० लक्ष |
| ०३ | डब्ल्यु-२१६ | भांडवली कामे पाणी पुरवठा<br>वार्ड क्र.७६ विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे-५.०० लक्ष | नविन पथदिवे<br>वार्ड क्र.७६ एन-२ मध्ये हायमस्ट बसविणे-५.०० लक्ष |
| ०४ | डब्ल्यु-१७५ | विकास योजना भूखंडाचे संरक्षण<br>प.क्र.७६ मधिल विविध खुल्या जागा विकसीत करणे-२०.०० लक्ष | वार्ड-इ<br>वार्ड क्र.७६ मधिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा आरसीसी शेड बांधणे व परिसर विकसीत करणे-२.५० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०१ हर्सुल मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव (रद्द करावयाची कामे) | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-०७ | **स्लम भागात पुन:डांबरीकरण करणे**<br>वार्ड क्र.१ फुलेनगर/हर्सुल स्लम पुनर्डांबरीकरण करणे-१० लाख. | वार्ड क्र.१ हर्सुल गावामध्ये नवीन जलवाहिनी टाकणे-६१.०० लाख |
| डब्ल्यु-३१ | वार्ड क्र.१ हर्सुल वसाहत मनपा प्रा.शाळेस संरक्षित भिंत बांधणे-५.०० लाख | |

| | | |
|---|---|---|
| डब्ल्यु-१९८ | वार्ड क्र.१ हर्सुल स्मृती उद्यान विकसीत करणे-९.०० लाख | |
| डब्ल्यु-१९८ | वार्ड क्र.१ हर्सुल नाक्याजवळील उद्यान विकसीत करणे-५ लाख | |
| डब्ल्यु-२०६ | वार्ड क्र.१ हर्सुल मध्ये पुर्व व पश्चिम भागातील जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे -१४ लाख | |
| डब्ल्यु-२१४ | वार्ड क्र.१ हर्सुल पाण्याचे टाकीपासुन ते विहीरीपर्यंत लोखंडी पाईपलाईन टाकणे -१४.०० लाख | |
| डब्ल्यु-६७ | वार्ड क्र.१ हर्सुल मंजुर रेखांकना अंतर्गत नवीन खंडीकरण करणे -२.५ लाख | |
| डब्ल्यु-६१ | प्रभाग क्र.१ हर्सुल स्लम अंतर्गत फुलेनगर भागातील रस्त्यांचे खडीकरण करणे -१.५ लाख | |

सुचक : श्री.पुनमचंद बमणे                    अनुमोदक : श्री.सिताराम सुरे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०१ हर्सुल मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव (रद्द करावयाची कामे) | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-०७ | **स्लम भागात पुन:डांबरीकरण करणे** वार्ड क्र.१ फुलेनगर/हर्सुल स्लम पुनर्डांबरीकरण करणे-१० लाख. | |
| डब्ल्यु-३१ | वार्ड क्र.१ हर्सुल वसाहत मनपा प्रा.शाळेस संरक्षित भिंत बांधणे-५.०० लाख | वार्ड क्र.१ हर्सुल गावामध्ये नवीन जलवाहिनी टाकणे-६१.०० लाख |
| डब्ल्यु-१९८ | वार्ड क्र.१ हर्सुल स्मृती उद्यान विकसीत करणे-९.०० लाख | |
| डब्ल्यु-१९८ | वार्ड क्र.१ हर्सुल नाक्याजवळील उद्यान विकसीत करणे-५ लाख | |
| डब्ल्यु-२०६ | वार्ड क्र.१ हर्सुल मध्ये पुर्व व पश्चिम भागातील जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे -१४ लाख | |
| डब्ल्यु-२१४ | वार्ड क्र.१ हर्सुल पाण्याचे टाकीपासुन ते विहीरीपर्यंत लोखंडी पाईपलाईन टाकणे -१४.०० लाख | |
| डब्ल्यु-६७ | वार्ड क्र.१ हर्सुल मंजुर रेखांकना अंतर्गत नवीन खंडीकरण करणे -२.५ लाख | |
| डब्ल्यु-६१ | प्रभाग क्र.१ हर्सुल स्लम अंतर्गत फुलेनगर भागातील रस्त्यांचे खडीकरण करणे -१.५ लाख | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल, नवा मोंढा (वार्ड-क कार्यालयाची इमारत) या इमारतीच्या तळमजल्यावर १० खाटांचे रूग्णालय सुरू करण्यात यावे. रूग्णालयासाठी आवश्यक असणारी जागा या इमारतीमध्ये उपलब्ध असून सध्या रिकामी आहे. आजुबाजूस असणारा परिसर भवानीनगर, कैलासनगर,संजयनगर,दत्तनगर,संजयनगर-बायजीपुरा, इंदिरानगर-बायजीपुरा,रेंगटीपुरा-रोहीदासपुरा,गांधीनगर,तक्षशीलानगर,निजामगंज कॉलनी,दादा कॉलनी इ.स्लम वसाहती असून या वसाहतींमधून अत्यंत गोरगरीब तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरीक राहतात. त्यांना आरोग्य सेवा पुरविण्याचे हेतूने वर नमुद केल्याप्रमाणे रूग्णालय सुरू करण्याची आवश्यक्ता आहे. सदर ठिकाणी २४ तास रूग्णालय सुरू केल्यास रूग्णालयाकरीता लागणारा स्टाफ (वैद्यकीय अधिकारी,ओ.टी.नर्स,ओ.पी.डी.नर्स,ड्युटीनर्स, लॅब टेक्नीशीयन,फार्मासीस्ट,क्लर्क,स्पीपर,परिचर, नाईट वॉचमन) व त्यावरील वार्षिक साधारणत: १५.०० लक्ष इतका खर्च अपेक्षीत आहे. रूग्णालयासाठी फर्निचर,साधन सामुग्री व वैद्यकीय उपकरणे यासाठी ५.०० लाख रूपये खर्च अपेक्षीत आहे.

त्याचप्रमाणे सदर इमारतीचे तळमजल्यावरील जागेत रूग्णालयासाठी आवश्यक असणारे किरकोळ फेरबदल, दुरूस्ती,पार्टीशन करणे,ऑपरेशन थिएटर,विद्युत फिटींग इ.कामे करावी लागणार आहे. या कामासाठी अंदाजे १०.०० लक्ष रूपयांचा खर्च अपेक्षीत आहे.

मोंढा भागातील छ.शिवाजी महाराज व्यापारी संकुलाचे इमारतीमध्ये रूग्णालय सुरू केल्यास आजुबाजुच्या परिसरातील जवळपास ५० हजार लोकवस्तीत राहणाऱ्या गरीब जनतेस त्याचा लाभ मिळू शकेल. तरी प्रस्तावात नमुद केल्यानुसार १० खाटांचे रूग्णालय सुरू करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

अनुमोदक : श्री.संतोष खेंडके, श्री.संतोष जेजुरकर, सौ.सरला पोळ, श्री.अशरफ मोतीवाला,
श्री.कैलास गायकवाड, श्री.संजु रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल, नवा मोंढा (वार्ड-क कार्यालयाची इमारत) या इमारतीच्या तळमजल्यावर १० खाटांचे रूग्णालय सुरू करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, येणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये खालील प्रमाणे दुरूस्तीचा प्रस्ताव घेण्यात यावा.

| पृष्ठ क्रमांक | कामाचे नांव | दुरूस्तीसह कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-११८ | प्रभाग क्र. ९४ गोळेगांवकर कॉलनी अंतर्गत पुर्नडांबरीकरण करणे.५.०० | प्रभाग क्र.९४ गोळेगांवकर कॉलनी भागात अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. ५.०० लक्ष |
| डब्ल्यु-१० अ.क्र.४० | प्रभाग क्रमांक ९४ राहुलनगर भागात पेव्हर ब्लॉक बसविणे ५.०० लक्ष. | प्रभाग क्र.९४ बन्सीलाल नगर अंतर्गत श्री.देवजीभाई पटेल यांच्या घरासमोर व रेल्वेस्टेशन हमालवाडी परीसरातील |

| | | |
|---|---|---|
| डब्ल्यु-१२३<br>अ.क्र.२० | प्रभाग क्रमांक ९४ अंतर्गत संत गाडगे महाराज मंगल कार्यालयात परीसरात पेव्हर बसविणे. २.०० | उर्वरीत भागात पेव्हर ब्लॉक बसविणे. ५.००+२.००=७.०० लक्ष |
| डब्ल्यु-४१<br>अ.क्र.१२ | प्रभाग क्रमांक ९४ अंतर्गत बन्सीलालनगर, राजनगर भागात मोठ्या व्यासाची मेन सिव्हर लाईन टाकणे. ५.०० लक्ष | प्रभाग क्रमांक ९४ येथे क्रिडा संकुल विकसीत करणे. ५.०० लक्ष |
| डब्ल्यु-११६ | प्रभाग क्र.९४ बन्सीलालनगर मनपा प्राथमिक शाळा रंगरंगोटी व दुरूस्ती करणे.-२.०० लक्ष | प्रभाग क्र.९४ बन्सीलालनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत सुशोभीकरण करणे २.०० लक्ष. |

सुचक : सौ. अल्पा विकास जैन अनुमोदक : सौ.अनिता घोडेले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९४ साठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्षक बदलणेस मंजुरी देण्यात येते.

| पृष्ठ क्रमांक | कामाचे नांव | दुरूस्तीसह कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-११८ | प्रभाग क्र. ९४ गोळेगांवकर कॉलनी अंतर्गत पुर्नडांबरीकरण करणे.५.०० | प्रभाग क्र.९४ गोळेगांवकर कॉलनी भागात अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. ५.०० लक्ष |
| डब्ल्यु-१०<br>अ.क्र.४०<br><br>डब्ल्यु-१२३<br>अ.क्र.२० | प्रभाग क्रमांक ९४ राहुलनगर भागात पेव्हर ब्लॉक बसविणे ५.०० लक्ष.<br><br>प्रभाग क्रमांक ९४ अंतर्गत संत गाडगे महाराज मंगल कार्यालयात परीसरात पेव्हर बसविणे. २.०० | प्रभाग क्र.९४ बन्सीलाल नगर अंतर्गत श्री.देवजीभाई पटेल यांच्या घरासमोर व रेल्वेस्टेशन हमालवाडी परीसरातील उर्वरीत भागात पेव्हर ब्लॉक बसविणे.<br><br>५.००+२.००=७.०० लक्ष |
| डब्ल्यु-४१<br>अ.क्र.१२ | प्रभाग क्रमांक ९४ अंतर्गत बन्सीलालनगर, राजनगर भागात मोठ्या व्यासाची मेन सिव्हर लाईन टाकणे. ५.०० लक्ष | प्रभाग क्रमांक ९४ येथे क्रिडा संकुल विकसीत करणे. ५.०० लक्ष |
| डब्ल्यु-११६ | प्रभाग क्र.९४ बन्सीलालनगर मनपा प्राथमिक शाळा रंगरंगोटी व दुरूस्ती करणे.-२.०० लक्ष | प्रभाग क्र.९४ बन्सीलालनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत सुशोभीकरण करणे २.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रामगिरी हॉटेल ते एन-५ सिडको पाण्याची टाकी या मार्गास जेष्ठ पत्रकार 'बाबा दळवी' यांचे नाव देण्यात यावे. म.य.दळवी यांनी पत्रकारिता व समाजसेवेच्या क्षेत्रात महत्वपूर्ण काम केलेले आहे.

करीता रामगिरी हॉटेल ते एन-५ सिडको पाण्याची टाकी या मार्गास 'जेष्ठ पत्रकार बाबा दळवी' असे नांव देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.कैलास गायकवाड अनुमोदक : सौ.सरला पोळ, श्रीमती मिराबाई शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रामगिरी हॉटेल ते एन-५ सिडको पाण्याची टाकी या मार्गास 'जेष्ठ पत्रकार बाबा दळवी' यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अयोध्यानगर येथील रहिवासी अमित भगवान सोनवणे या ८ वर्षाच्या बालकाचा दिनांक १६.६.२००७ रोजी सिडको एन-८ येथे मनपाच्या विद्युत खांबात उतरलेल्या वीजप्रवाहामुळे अमित भगवान सोनवणे हा मुलगा विद्युतचा शॉक लागून दुर्देवी अंत झाला. सदर मृत झालेल्या बालकाचे वडील एक वर्षापुर्वी निधन झालेले असुन त्याच्या कुटूंबावर दुखाचे डोंगर कोसळले आहे. मृत्यूचे कारण मिमांकनुसार घाटी रूग्णालयातील तज्ञांनी विद्युत शॉकमुळे मृत्यू झाल्याचे प्रमाणीत केले आहे.

तरी सदर कुटूंबाचा आधार संपलेला असल्याने मयत मुलाच्या कुटूंबास, महानगरपालिकेच्या विद्युत खांबाला चिटकुन ही घटना घडल्याने नुकसान भरपाई म्हणून १ लाख रूपये अर्थसहाय्य देणे योग्य करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील, सौ.लता दलाल,श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे,
श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार ,

अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल, श्री.काशिनाथ कोकाटे, सौ.रजनी जोशी, श्री.मोहन मेघावाले,
सौ.विमल बेंद्रे, श्री.महेश माळवतकर, सौ.छाया राऊत, श्री.भाऊसाहेब ताठे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अयोध्यानगर एन-८ येथील रहिवासी अमित भगवान सोनवणे या मुलाचा विद्युत शॉक लागून दुर्देवी अंत झाल्याने आणि सदर घटना मनपाच्या परिसरात घडल्याने सदर मयत मुलाच्या पाल्यास रू.१.०० लाख अर्थसहाय्य देणेस मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे महापौर चषक स्पर्धे अंतर्गत विविध क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात येत असतात. त्याचप्रमाणे यावर्षी अखिल भारतीय महापौर चषक ज्युदो स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार, श्री.संजय जगताप

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे अखिल भारतीय महापौर चषक ज्युदो स्पर्धा आयोजित करण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२७ शताब्दीनगर येथे महानगरपालिकेची एकही शाळा नसल्याने माझ्या वार्डातील गरीब व हात मजुरी करणारे रहिवासीयांच्या मुलांना शिक्षणासाठी दुसऱ्या ठिकाणी जावे लागते. तसेच माझ्या वार्डात जवळपास ८०% दलित समाजाचे लोक राहतात व ते त्यांच्या मुलांना ४ किलो मिटर दुर शाळेत पाठवित नसल्याने ते शिक्षणापासून वंचित राहत आहे. वार्ड क्र.२७ मध्ये महानगरपालिकेची खुली जागा उपलब्ध असून त्या जागेवर महानगरपालिकातर्फे शाळा बांधण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.अजरा जबीन मसुद खान

अनुमोदक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार, श्री.सय्यद खुसरो स.बुऱ्हानोद्यीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२७ शताब्दीनगर मध्ये महानगरपालिकेच्या उपलब्ध खुल्या जागेवर महानगरपालिकेतर्फे शाळा बांधण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.५९ अजबनगर, खोकडपुरा येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग ५९ मधील जालना रोड ते बंजारा कॉलनी रोड साईड लगत गटार बांधणे. पृ.क्र.डब्ल्यु.३७ अ.क्र.६ तरतूद रक्कम ५ लक्ष. | प्रभाग क्र.५९ राधामोहन कॉलनी येथील श्री.डोंगरे यांच्या घरा समोरील उद्यान व हॉलचे उर्वरीत काम करणे. |

सुचक : श्री.सतिष कटकटे

अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.विजय खुडे,श्री.बाबासाहेब डांगे,श्री.राजेश व्यास

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५९ अजबनगर, खोकडपुरासाठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग ५९ मधील जालना रोड ते बंजारा कॉलनी रोड साईड लगत गटार बांधणे. पृ.क्र.डब्ल्यु.३७ अ.क्र.६ तरतूद रक्कम ५ लक्ष. | प्रभाग क्र.५९ राधामोहन कॉलनी येथील श्री.डोंगरे यांच्या घरा समोरील उद्यान व हॉलचे उर्वरीत काम करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग ७९ मुकुंदवाडी चौकात सुशोभिकरण करणे पृ.क्र.डब्ल्यु.१९० अ.क्र.२३ तरतुद रक्कम ५ लक्ष | मुकुंदवाडी मनपा शाळेवर पहीला मजला बांधणे. |
| ०२. | प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी येथे मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे. पृ.क्र.१९९ अ.क्र.३१ तरतुद रक्कम ५ लक्ष. | मुकुंदवाडी मनपा शाळेवर पहीला मजला बांधणे. |
| ०३. | प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी अंतर्गत स्मशानभूमी विकसीत करणे. पृ.क्र.डब्ल्यु २३० अ.क्र.११ तरतुद रक्कम ५ लक्ष | प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी येथील विविध भागात हातपंप बसविणे. |

सुचक : श्री.बाबासाहेब लक्ष्मणराव डांगे
अनुमोदक : सौ.विमल तुकाराम बेंद्रे,श्री.सतिष कटकटे, श्री.विजय खुडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग ७९ मुकुंदवाडी चौकात सुशोभिकरण करणे पृ.क्र.डब्ल्यु.१९० अ.क्र.२३ तरतुद रक्कम ५ लक्ष | मुकुंदवाडी मनपा शाळेवर पहीला मजला बांधणे. |
| ०२. | प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी येथे मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे.<br>पृ.क्र.१९९ अ.क्र.३१ तरतुद रक्कम ५ लक्ष. | मुकुंदवाडी मनपा शाळेवर पहीला मजला बांधणे. |
| ०३. | प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी अंतर्गत स्मशानभूमी विकसीत करणे.<br>पृ.क्र.डब्ल्यु २३० अ.क्र.११ तरतुद रक्कम ५ लक्ष | प्रभाग क्र.७९ मुकुंदवाडी येथील विविध भागात हातपंप बसविणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या नंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद